# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in

**परिपत्रकः** जा.क्र.तंशिविकापु/विवि-१/वृक्ष लागवड/निधी वितरण/२०१९/ 4767
दिनांक : 20 NOV 2019

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील
सर्व पदविका, तसेच व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या
पदवी व पदव्युत्तर तंत्रशिक्षण संस्था
(पुणे विभाग)

**विषय :- वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत निधी वाटप करण्याकरीता, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९ रोजीची माहिती सादर करणेबाबत.**

संदर्भ :- १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.८१/आस्था-२, दि.०६/०९/२०१९.
२. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक : १६/आस्था/निधी वितरण/२०१९/२८७, दि. २०/०९/२०१९.
३. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.तंशिविकापु/विवि/निधी वितरण/२०१९/४३६३, दि. १९.१०.२०१९.
४. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक : १६/आस्था/वृक्षलागवड/निधी वितरण/२०१९/३१७, दि. १८/११/२०१९.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यांत येते की, सन २०१९-२० या वित्तीय वर्षाकरीता वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत निधी वितरीत करण्याबाबत उपरोक्त संदर्भ क्र. १ चा शासन निर्णय निर्गमित झाला असून, सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने पात्र संस्थांना निधीचे वाटप करावयाचे असल्याने, तंत्रशिक्षण संचालनालयाने, वरील संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये सन २०१९ मध्ये केलेल्या वृक्ष लागवडीची तसेच तत्पूर्वी सन २०१६, २०१७ व २०१८ मध्ये केलेल्या वृक्ष लागवडीच्या अनुषंगाने सध्या जीवंत असलेल्या वृक्षांची संख्या याबाबतची अचूक माहिती दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत सादर करण्याविषयी कळविले होते. त्यास अनुसरुन ज्या संस्थांनी विहित कालमर्यादेत याविषयाची माहिती या कार्यालयास सादर केली आहे, अशा संस्थांची एकत्रित माहिती संचालनालयामार्फत शासनास सादर करण्यात आलेली होती.

परंतु ब-याच संस्थांनी सदरची माहिती विहित कालमर्यादेत या कार्यालयास सादर केलेली नाही. सबब आपणास पुन्हा कळविण्यांत येते की, सन २०१६, २०१७, २०१८ व २०१९ मध्ये केलेल्या वृक्ष लागवडीबाबतची **बिनचूक** माहिती Dash Board / Profile Screen Shot सह सोबत जोडलेल्या विवरणपत्रात **info.ropune@gmail.com** वर **Excel Sheet, Soft Copy** व **PDF** मध्ये **दिनांक २७.११.२०१९ पर्यंत, दुपारी ०३.०० पर्यंत** ई-मेलव्दारे / खास दूतामार्फत या कार्यालयास सादर करण्यात यावी. सदरची माहिती एकत्रित करावयाची असल्याने, ज्या संस्था विहित कालमर्यादेत सदरची माहिती सॉफ्-ट कॉपीसह पाठविणार नाहीत, अशा संस्थांचा निधी वाटपासाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(मागे पहावे)

शासनाने वृक्ष लागवड, कार्यक्रमाचे नियोजन, पूर्वतयारी, संभाव्य अडचणी, उपाययोजना सन २०१९-२० करीता निधी उपलब्ध करुन दिलेला असल्याचे वरील संदर्भ क्रमांक ४ च्या पत्रान्वये संचालनालयाने कळविलेले आहे (सुलभ संदर्भासाठी सोबत प्रत जोडली आहे). परंतु संदर्भाधिन शासन निर्णयान्वये उपलब्ध झालेल्या निधीचे खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून वाटप करण्यात येणार आहे.

१) सदर निधी ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आलेला आहे. त्या कारणासाठीच याचा विनियोग करणे बंधनकारक आहे. याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.
२) संबंधित संस्थांनी मजूरी, पुरवठा व सामग्री याकरीता केलेल्या खर्चाची मूळ देयके (Original Bills) / उपप्रमाणके (Vouchers) टपालाव्दारे अथवा खास दूतामार्फत सादर करणे बंधनकारक आहे
३) सदर निधीतून केलेल्या खर्चाचे वेगळे लेखे ठेवणे आवश्यक आहे.
४) शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार संबंधित कार्यालयांनी संपूर्ण वर्षाकरिता आवश्यक निधीची गणना करुन वितरणाचे संपूर्ण वर्षाचे स्वतंत्र विवरणपत्र तयार करणे आवश्यक आहे. ज्यायोगे विवरणपत्रा नुसार निधीचा हिशोब परिपूर्ण होईल.
५) संबंधित संस्थेस सन २०१९-२० मध्ये वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
६) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई यांना तसेच शासनास किंवा शासनाने त्यासाठी प्राधिकृत केलेल्या अधिका-यास लेखा परिक्ष्णाकरीता संबंधित संस्था / कार्यालय यांची विवरणपत्रे व लेखापाहणीचा अधिकार राहील.यासाठी लेखे तयार ठेवावेत.
७) संबंधित संस्थेने दिलेल्या उद्दिष्टानुसार किंबहुना त्यापेक्षा जास्त केलेल्या वृक्ष लागवडीची माहिती वन विभागाच्या www.greenarmy.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करुन, त्याबाबतचा पुरावा Dash Board / Profile Screen Shot सह सादर करणे आवश्यक आहे.

सोबत : विवरणपत्राचा नमुना.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

## वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९ रोजीची सद्यस्थिती

| डी.टी.ई कोड | जिल्हा | तालुका | संस्थेचे नांव | २ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत सन २०१६ मध्ये दिलेले वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट | प्रत्यक्ष केलेली वृक्ष लागवड | सध्या जीवंत असलेल्या वृक्षांची संख्या | केलेल्या वृक्ष लागवडीची माहिती वन विभागाच्या डिजीटल प्लॅटफॉर्मवर अपलोड केली आहे का ? | ४ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत सन २०१७ मध्ये दिलेले वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट | प्रत्यक्ष केलेली वृक्ष लागवड | सध्या जीवंत असलेल्या वृक्षांची संख्या | केलेल्या वृक्ष लागवडीची माहिती वन विभागाच्या डिजीटल प्लॅटफॉर्मवर अपलोड केली आहे का ? | १३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत सन २०१८ मध्ये दिलेले वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट | प्रत्यक्ष केलेली वृक्ष लागवड | सध्या जीवंत असलेल्या वृक्षांची संख्या | केलेल्या वृक्ष लागवडीची माहिती वन विभागाच्या डिजीटल प्लॅटफॉर्मवर अपलोड केली आहे का ? | ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत सन २०१९ मध्ये दिलेले वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट | प्रत्यक्ष केलेली वृक्ष लागवड | सध्या जीवंत असलेल्या वृक्षांची संख्या | केलेल्या वृक्ष लागवडीची माहिती वन विभागाच्या डिजीटल प्लॅटफॉर्मवर अपलोड केली आहे का ? | सन २०१९ मध्ये मजूरीसाठी झालेला खर्च | सन २०१९ मध्ये पुरवठा व सामग्री साठी झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

संस्था प्रमुखाची स्वाक्षरी

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दूरध्वनी - ३०२३३४७६, २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स - २२६९०००७.

Email : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :www.dtemaharashtra.gov.in


**कार्यालयीन आदेश**

क्रमांक : १६/आस्था/वृक्षलागवड निधी वितरण/२०१९-२०/३१७

दिनांक : 16 NOV 2019

**पहा : उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.८१/आस्था-२, दिनांक ६.९.२०१९**

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयान्वये वृक्ष लागवडीसाठी प्राप्त झालेले उद्दिष्ट विचारात घेवून, वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नियोजन, पूर्वतयारी, संभाव्य अडचणी, उपाययोजना यांकरिता सन २०१९-२० साठी मागणी क्र.डब्ल्यू-७, २४०६-वनीकरण व वन्यजीवन, ०४-वनीकरण व पर्यावरण विकास, १०१ राष्ट्रीय वनीकरण व पर्यावरण विकास कार्यक्रम, (००) (०१) शाश्वत विकास ध्येय, (ध्येय १५-जमिनीवरील सजीव) अंतर्गत वृक्ष लागवड व संवर्धन (१०० % राज्य योजना) (कार्यक्रम) (२४०६ ए ३१८), ०२ मजूरी, २१ पुरवठा व सामग्री या लेखाशीर्षाखाली शासनाने रूपये १,२४,२०,०००/- (रूपये एक कोटी चोवीस लाख वीस हजार) इतका निधी उपलब्ध केलेला आहे.

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून खालील परिशिष्टात नमूद सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय यांच्या नावासमोर दर्शविलेल्याप्रमाणे निधी वितरित करण्यात येत आहे. सदर निधी लागवड करण्यात आलेल्या वृक्षांच्या विभागीय कार्यालय निहाय टक्केवारीनुसार आपल्या अधिपत्याखालील संबंधित आहरण व नियंत्रण अधिकारी यांना नियमानुसार व आवश्यकतेनुसार निधीचे वाटप करण्यात यावे.

संदर्भाकित शासन निर्णयान्वये मंजूर केलेला निधी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

१) सदर निधी ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आलेला आहे, त्या कारणासाठीच याचा विनियोग करणे बंधनकारक आहे, याबाबतची जबाबदारी संबंधित कार्यालय / संस्थेची राहील.
२) सदर निधीतून केलेल्या खर्चाचे वेगळे लेखे ठेवणे आवश्यक आहे.
३) शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनांनुसार संबंधित कार्यालयांनी संपूर्ण वर्षाकरीता आवश्यक निधीची गणना करून वितरणाचे संपूर्ण वर्षाचे स्वतंत्र विवरणपत्र तयार करणे आवश्यक आहे. ज्यायोगे विवरणपत्रानुसार निधीचा हिशोब परिपूर्ण राहील.
४) सदर रक्कम अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे (BDS) उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यामुळे सदर रक्कम अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे (BDS) काढून घेऊन ती तात्काळ संबंधितांना वितरित करण्याची जबाबदारी संबंधित सहसंचालकांची राहील.
५) महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई आणि महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर यांना तसेच शासनास किंवा शासनाने त्यासाठी प्राधिकृत केलेल्या अधिका-यास लेखा परिक्षणाकरीता संबंधित संस्था / कार्यालय यांची विवरणपत्रे व लेखापाहणीचा अधिकार राहील यासाठी आवश्यक लेखे तयार ठेवावेत.
६) उपरोक्त लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० मध्ये वितरित केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित विभागीय कार्यालयांनी संचालनालयास सादर करावे.

७) सदर निधी वितरित करताना वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ८ जुलै, २०१९ मधील निर्देशांचे पालन करणे सर्व संबंधित संस्थांना / कार्यालयांना बंधनकारक आहे.

८) सदर प्रकरणी कार्यालये / संस्था यांना अतिप्रदान झाल्यास एकरकमी वसूलीबाबतचे हमीपत्र संबंधितांकडून घेण्यात यावे व नंतरच निधी वितरीत करण्यात यावा.

सदरचा खर्च मागणी क्र.डब्ल्यू-७, २४०६-वनीकरण व वन्यजीवन, ०४-वनीकरण व पर्यावरण विकास, १०१ राष्ट्रीय वनीकरण व पर्यावरण विकास कार्यक्रम, (००) (०१) शाश्वत विकास ध्येय, (ध्येय १५-जमिनीवरील सजीव) अंतर्गत वृक्ष लागवड व संवर्धन (१०० % राज्य योजना) (कार्यक्रम) (२४०६ ए ३१८), ०२ मजूरी, २१ पुरवठा व सामग्री या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून तो सन २०१९-२०२० या वर्षाकरीता उपलब्ध केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. सदर निधी दिनांक ३१.१२.२०१९ पूर्वी खर्च टाकण्यात यावा.

तसेच वितरित निधीचा खर्चमेळ याबाबतची कार्यवाही संबंधित विभागीय कार्यालयाने पूर्ण करून खर्चाची विवरणपत्रे या संचालनालयास सादर करावीत.

**परिशिष्ट - अ**

| अ.क्र. | विभागीय कार्यालयाचे नाव | वृक्षलागवडीच्या टक्केवारीनुसार वितरित करावायाचा निधी (रूपये) |
|---|---|---|
| १ | सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई | ३,२७,८८८/- |
| २ | सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे | ३०,३२,९६४/- |
| ३ | सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक | ४,५२,०८८/- |
| ४ | सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद | ७०,५९,५२८/- |
| ५ | सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती | ५,२५,३६६/- |
| ६ | सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर | १०,२२,१६६/- |
| | एकूण | १,२४,२०,०००/- |

( डॉ. अभय वाघ)
**संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर :-**

१. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई / नागपूर (मानार्थ).
३. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, बांद्रा, मुंबई ४०० ००१ (मानार्थ).
४. जिल्हा कोषागार कार्यालये, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर (मानार्थ) (संबंधित विभागीय कार्यालयामार्फत).
५. कार्यासन क्रमांक १५, मुख्य कार्यालय, मुंबई.
६. कार्यासन क्रमांक १६, मुख्य कार्यालय, मुंबई (निवड नस्ती).

सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षाकरिता वृक्ष लागवड संगोपनासाठी निधी वितरीत करण्याबाबत...

पत्र प्राप्त झाले
13 SEP 2019
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मुंबई-१

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०१९/प्र.क्र.८१/आस्था-२,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई.४०० ०३२
**दिनांक : ०६ सप्टेंबर, २०१९**

**संदर्भ:** १) महसूल वन विभाग, शा.नि. क्र.साववि-२०१६/प्र.क्र.८०(भाग-२)/फ-११, दि.२५.०७.२०१८
२) महसूल वन विभाग, शासन निर्णय क्र.साववि-२०१८/प्र.क्र.१४४/फ-११, दि.०६.०९.२०१८
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४. २०१९
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ०८.०७. २०१९
५) या विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.३०/साशि-१, दिनांक १२.०७.२०१९

**प्रस्तावना:**

दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्ष, पूर, अतिवृष्टी आणि इतर नैसर्गिक आपत्ती यावर उपाययोजना म्हणून मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करणे आवश्यक असल्याची बाब सर्व स्तरावर मान्य झालेली आहे. राज्यातील वनक्षेत्र २०% वरुन ३३% पर्यंत नेण्यासाठी हरित महाराष्ट्र ही संकल्पना राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत [illegible] कोटी वृक्षारोपणाचा कार्यक्रम ३ वर्षामध्ये राबविण्याचा राज्य शासनाने संकल्प केला आह. बनक्षेत्रावर वृक्ष लागवडीसाठी मर्यादा येत असल्यामुळे वनेत्तर (Non Forest) क्षेत्रावर वृक्ष लागवडीसाठी मोठ्या प्रमाणात भर द्यावा लागणार आहे. त्यानुषंगाने सन २०१९-२० मधील वृक्षारोपणासाठी संभाव्य स्थळे निश्चित करुन त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयामार्फत वृक्षारोपणाची कार्यवाही सुरु आहे.

महसूल व वन विभागाच्या दि.२५.०७.२०१८च्या शासन निर्णयानुसार वृक्ष लागवड व त्यानंतरचे संगोपन यासाठी शासन निर्णय, संकिर्ण-२०१६/(१५१/१६)/आस्था-२, दिनांक १४.०२.२०१९ नुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत नवीन लेखाशीर्ष उघडण्यात आले आहे. सबब महसूल व वन विभागाच्या दिनांक ०६.०९.२०१८च्या शासन निर्णयानुसार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करुन देण्यात आले आहे. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या वर्षासाठी वृक्ष लागवड आणि संगोपन यासाठी निधी उपलब्ध झाला असून सदर निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

विभागास वृक्ष लागवडीसाठी प्राप्त झालेले उद्दिष्ट विचारात घेता, वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नियोजन, पूर्वतयारी, संभाव्य अडचणी, उपाययोजना याकरिता सन २०१९-२० साठी **"मागणी क्र. डब्ल्यू-७, २४०६-वनीकरण व वन्यजीवन, ०४-वनीकरण व पर्यावरण विकास, १०१ राष्ट्रीय वनीकरण व पर्यावरण विकास कार्यक्रम, (००) (०१) शाश्वत विकास ध्येय, (ध्येय १५-जमिनीवरील सजीव) अंतर्गत वृक्ष लागवड व संवर्धन (१००% राज्य योजना) (कार्यक्रम) (२४०६ ए ३१८), ०२ मजूरी, २१ पुरवठा व सामग्री** या लेखाशीर्षाखाली ₹ ४१४०००००/-कोटी (अक्षरी रुपये चार कोटी चौदा लाख फक्त) इतकी तरतूद मंजूर

करण्यात आली आहे. संदर्भाधीन अ.क्र.५ येथील शासन परिपत्रक मंजूर तरतूदीच्या ६० टक्के म्हणजेच ₹२,०८,००,००० (अक्षरी दोन कोटी अठ्ठेचाळीस लक्ष चाळीस हजार फक्त) इतकी तरतूद ऑगस्ट, २०१९ ते डिसेंबर, २०१९ या पाच महिन्यांकरिता उपलब्ध आहे. सदर तरतूद उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील १) उच्च शिक्षण व २) तंत्र शिक्षण या दोन कार्यालयांसाठी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे संगोपन याकरिता याकरिता खालीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

| क्षेत्रीय कार्यालय | ठरवून देण्यात आलेले उद्दिष्ट | वितरीत करावयाच्या निधीची विगतवारी | | वितरीत करावयाचा निधी |
|---|---|---|---|---|
| | | ०२-मजूरी | २१-पुरवठा व सामग्री | |
| संचालक, उच्च शिक्षण, पुणे | ३,५३,००० | ४५,००,००० | ७९,२०,००० | ₹१,२४,२०,००० |
| संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई | ३,५३,००० | ४५,००,००० | ७९,२०,००० | ₹१,२४,२०,००० |
| **एकूण** | **७,०६,०००** | **९०,००,०००** | **१,५८,४०,०००** | **₹२,४८,४०,०००** |

२. सदर निधी हा विभागातंर्गत असलेल्या क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात येत आहे. मागील लावलेल्या रोपांपैकी किती रोपे जिवंत आहेत याचा आढावा घेऊन तसेच २०१९ मध्ये किती रोपे लावली ते निश्चित करुन त्यानंतर त्यांना आवश्यकतेनुसार पुढील निधीचे वाटप करण्यात यावे.

३. सदर निधी नियंत्रण अधिकारी म्हणून उप सचिव (आस्था-२), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई व क्षेत्रीय कार्यालयामधील संचालक (उच्च शिक्षण), पुणे व संचालक (तंत्र शिक्षण), मुंबई हे राहतील. तरी सदर निधी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून उपरोक्त नमूद क्षेत्रिय स्तरावरील दोन्ही नियंत्रक अधिकाऱ्यांना वितरित करण्यात येत आहे. त्यांनी सदर निधी आपल्या अधिपत्याखालील संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना नियमानुसार वितरीत करावा.

४. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेला निधी खालील अटी व शर्तीच्या अधीन आहे.

१) सदर निधी ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आले आहे, त्या कारणासाठीच याचा विनियोग करणे बंधनकारक आहे. याबाबतची जबाबदारी संबंधित कार्यालय यांची राहील.

२) सदर निधीतून केलेल्या खर्चाचे वेगळे लेखे ठेवणे आवश्यक आहे.

३) शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनांनुसार संबंधित कार्यालयांनी संपूर्ण वर्षाकरीता आवश्यक निधीची गणना करुन वितरणाचे संपूर्ण वर्षाचे स्वतंत्र विवरणपत्र तयार करणे आवश्यक आहे. ज्यायोगे विवरणपत्रानुसार निधीचा हिशोब परिपूर्ण राहील.

४) सदर रक्कम अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे (BDS) उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामुळे सदर रक्कम अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे (BDS) काढून घेऊन ती तात्काळ संबंधितांना वितरित करावी. शासनाने वितरित केलेला निधी संबंधितांना विनाविलंब मिळेल याची जबाबदारी नियंत्रण अधिकारी यांची राहील.

५) महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई आणि महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर यांना तसेच शासनास किंवा शासनाने त्यासाठी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास लेखा परिक्षणाकरीता संबंधित कार्यालयाची विवरणपत्र व लेखापाहणीचा अधिकार राहील यासाठी त्यांनी सहकार्य द्यावे.

उपरोक्त लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० मध्ये वितरित केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित क्षेत्रिय कार्यालयांनी शासनास सादर करावे.

७) सदर निधी वितरित करताना वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ०८ जुलै, २०१९ मधील निर्देशांचे पालन करणे सर्व क्षेत्रिय कार्यालयांना बंधनकारक आहे.

५. सदरचा खर्च "मागणी क्र. डब्ल्यू-७, २४०६-वनीकरण व वन्यजीवन, ०४-वनीकरण व पर्यावरण विकास, १०१ राष्ट्रीय वनीकरण व पर्यावरण विकास कार्यक्रम, (००) (०१) शाश्वत विकास ध्येय, (ध्येय १५- जमिनीवरील सजीव) अंतर्गत वृक्ष लागवड व संवर्धन (१००% राज्य योजना) (कार्यक्रम) (२४०६ ए ३१८), ०२ मजूरी, २१ पुरवठा व सामग्री" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून तो सन २०१९-२०२० या वर्षाकरीता उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

६. तसेच वितरित निधीचा खर्चमेळ याबाबतची कार्यवाही संबंधित क्षेत्रिय कार्यालयांनी पूर्ण करुन खर्चाची विवरणपत्रे शासनाकडे पाठवावी.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०८ जुलै, २०१९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(द. रा. कहीर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई /नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
आहरण व संवितरण अधिकारी, रोख शाखा, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, उच्च शिक्षण, पुणे.
संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई.
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय), यांचे स्वीय सहायक.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
अवर सचिव, फ-११, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
अवर सचिव, वित्त विभाग (व्यय-१५/अर्थसंकल्प-११) मंत्रालय, मुंबई.
अवर सचिव, नियोजन विभाग(का-१४४३), मंत्रालय, मुंबई.
कक्ष अधिकारी (साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती- आस्था-२